# प्रेस नोट

## ''भंडारा जिल्हा वार्षिक पोलीस कल्याण सप्ताह निमीत्ताने मेडिटेशन (विपश्यना) शिबीर आयोजन ''

जा.क्र. २९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:– ११/०६/२०१८

भंडारा: मा. पोलीस महासंचालक यांचे सौजन्याने तसेच मा. पोलीस अधिक्षक विनीता. साहू मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेला १ ते ९ जुन हा पोलीस कल्याण सप्ताह म्हणुन साजरा करण्यात आला. वार्षिक पोलीस कल्याण सप्ताह भंडारा जिल्हा पोलीस दलाचे वतीने शासनाच्या विवीध योजने बाबत जागरुकता निर्माण करण्याकरीता आज दिनांक ०९/०६/२०१८ चे ०७.०० वाजता पासुन ड्रिल शेड पोलीस मुख्यालय, भंडारा येथे मेडिटेशन (विपश्यना) शिबीराचे आयोजन मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड तसेच मेडिटेशन प्रशिक्षक श्री. दिपक चढ्ढा यांचे प्रमुख उपस्थितीत घेण्यात आले.

पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दैनदिंन जीवनमान अतिशय ताणतणाव व धकाधकीचे असून काहींना आपल्या कुटुबियांपासुन अलिप्त राहावे लागत असल्याने त्यांच्यात नैराश्य वाढत जाते सदर बाब गंभिर असून कर्मचाऱ्यांचे ताणतणाव कसे घालवता येईल व सकारात्मकदृष्टया जीवन आंनदाने कसे जगता येईल, तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना नक्षलविरोधी अभियान, कोंबींग ऑपरेशन करावे लागते हे लक्षात घेऊन त्यांच्यात मानसिक व शारीरिक बदल घडवून सकारात्मक भावना व जीवन जगण्याची कला अवगत व्हावी या उद्देशाने आज मेडिटेशन (विपश्यना) शिबीराचे आयोजन करण्यात आले.

मेडिटेशन(विपश्यना)ध्यान शिबीरात मा.पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर, प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) पोनी. ताजणे, पोनी. नेवारे पो. स्टे. जवाहरनगर, पो. नी. बन्सोडे पो. स्टे. लाखांदुर, सपोनि. पोटे, सपोनि. काळे स्थागुशा भंडारा पोलीस मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक प्रधान, तसेच कार्यक्रमाला पोलीस अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.